# सुचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सुचित करण्यात येते की,

करोना विषाणूचा होणारा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून शासन, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या निर्देशानुसार महाविद्यालय (अध्यापनाचे कार्य) दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्यात येत आहे दि. ३१/०३/२०२० पर्यंत विद्यार्थ्यांना सुट्टी राहील.

**असे असले तरी**

१) विद्यापीठाच्या प्रात्यक्षिक परिक्षा व लेखी परिक्षा विद्यापीठाच्या नियोजीत वेळापत्रकानुसार होतील.

२) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना महाविद्यालयीन डयुटीवर यायचे असून आपली नियीमत प्रशासकीय व इतर शैक्षणिक कामे (अध्यापनाच्या कार्या व्यतिरिक्त) करावयाची आहे.

**विद्यार्थ्यांनी खालील सुचनाकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे**

१) विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली असली तरी विद्यार्थ्यांनी अनावश्यकरित्या फिरु नये.

२) विद्यार्थ्यांनी स्वत:च्या घरी सुरक्षित रहावे व घरी बसून अभ्यास करावे.

३) वसतीगृहात राहात असलेल्या विद्यार्थ्यांनी वसतीगृहात सुरक्षित रहावे व तिथेच अभ्यास करावा किंवा त्याला स्वत:च्या मुळ गावी जाण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

४) कोणी अनावश्यकरित्या शहरात फिरताना आढळल्यास त्याच्या विरुध्द कारवाही होवू शकेल.

५) उपरोक्त बंधने जी विद्यार्थ्यांना घालून दिलेली आहेत ती बंधने परिक्षार्थी विद्यार्थ्यांना लागू राहणार नाहीत.

६) परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी परिक्षेचे ओळखपत्र व महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत बाळगावे

.

७) शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल.

८) महाविद्यालयाला विद्यार्थ्यांना सुचना/माहीती द्यावयाची असल्यास Massage द्वारे देण्यात येईल व महाविद्यालयाच्या Web - site वर प्रकाशित करण्यात येईल.

९) महाविद्यालयात कोणत्याही मोठया कार्यक्रमाचे आयोजन होणार नाहीत.

१०) सराव परिक्षेचे दिनांक १६/०३/२०२० पासूनचे सर्व पेपर्स रद्द करण्यात आले आहेत.

११) प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने महाविद्यालयातील वाचन कक्ष व सर्व क्रिडा सुविधा सदर कालावधीसाठी बंद राहतील.

प्राचार्य
निळकंठराव शिंदे विज्ञान व
कला महाविद्यालय, भद्रावती